एका शाळेच्या जन्माची कथा



रमेश खानविलकर
संस्थापक-संचालक

रश्मी खानविलकर
मुख्याध्यापिका

लेख पृष्ठ क्र. ४३ वर

Scanned with CamScanner

१९८९ ते ९३ भांडुपमध्ये प्रसिद्ध व लोकप्रिय आर. के. क्लासेस सुरू होते. क्लासेसच्या शाखा रमाबाईनगर, नरदासनगर, शिवनेरीनगर, तुलशेतपाडा अशा विविध ठिकाणी मात्र गलिच्छवस्ती विभागात होत्या. ८, १०, १२ रुपये प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मागे कास्पप्लॅन ही सेवाभावी संस्था फी द्यायची व विद्यार्थ्यांना मोफत शिकवायचे. बरे हे सर्वच विद्यार्थी घरी अठराविश्व दारिद्र्य असलेले व महानगरपालिकेच्या शाळेत शिक्षण घेणारे. माझ्या क्लासची पहिली बॅच सकाळी ७:३० वाजता सुरू व्हायची. सर्वच शाखांमध्ये मी एकटाच जाऊन विद्यार्थ्यांना शिकवत असे. कोणी सहाय्यक शिक्षक ठेवणे शक्य नव्हते. कारण मला माझ्या गरिबीमुळे माझे घर चालवायला पैशाची नितांत आवश्यकता होती. त्यामुळे सकाळी ७:३० ते ९:३० रमाबाईनगर, १०:३० ते १२:०० नरदासनगर, दुपारी २ ते ४ तुलशेतपाडा, ५ ते ७ शिवनेरीनगर, ७:३० ते रात्री १०:०० पुन्हा नरदासनगर असा सकाळी ७:३० ते रात्री १०:३० पर्यंत पायपीट करून विद्यार्थ्यांना शिकवण्याचा कार्यक्रम सुरू होता. ४ ते ५ वर्ष क्लासेस् चालवीत असताना अनेक शाळांच्या संपर्कात आलो. अनेक शिक्षकांची संबंध आले. पुढे पुढे क्लासेस्मध्ये खूप स्पर्धा वाढू लागली क्लासेस्ने आधुनिक स्वरूप धारण करण्यास सुरुवात केली. मी ज्या ठिकाणी क्लासेस चालवत होतो, त्या सर्व जागा झोपडपट्टीमधील एखाद्या मंडळाच्या कार्यालयाची खोली होती. त्यांना भाडेसुद्धा द्यावे लागायचे. पुढे कालांतराने कास्पप्लॅन संस्था भांडुपमधून जाणार हे निश्चित झाले. अशावेळी ही संस्था निघून गेली तर माझ्याकडे जागा नाही, पैसा नाही व आधुनिक क्लासेस्मध्ये पालक चांगल्या सोयी पाहणारे. अशावेळी जरी आपण चांगले शिकवत असलो तरी स्पर्धेत पैशाअभावी मागे पडणार म्हणून मग आपणच एखादी शाळा काढावी हे मनात निश्चित ठरवले आणि मी माझ्या मनात एखादी गोष्ट ठरवली तर ती कोणत्याही परिस्थितीत करणार हे निश्चित. म्हणून शाळेसाठी जागा शोधू लागलो. जागा शोधताना जेथे शाळा काढायची ती जागा झोपडपट्टीतच असली पाहिजे हा माझा कटाक्ष होता. कारण माझा जन्मच भांडुपच्या झोपडपट्टी भागातील. एकही शाळा नसल्याने व चांगल्या शाळेत डोनेशन भरण्याची ऐपत नसल्याने झोपडपट्टीमधील मुले सातवी आठवीच्या पुढे शिकत नव्हती शाळेचा शोध घेत-घेत मी खिंडीपाडा या भागात पोहचलो.

खिंडीपाडा हा परिसर भांडुप-मुलुंडच्या सीमेवर. बाजूला नॅशनल पार्कची सीमा. पाच मिनिटे चालत गेलो तर नॅशनलपार्कच्या परिसरात पाऊल पडेल. आजूबाजूला संपूर्ण झोपडपट्टी. त्या झोपडपट्टीत राहणारे गोरगरीब रोजंदारी करणारे दिवसा मोलमजुरी करायचे



राजारामशेठ विद्यालयाच्या सुरुवातीच्या काळातील वास्तूच्या भूमीपूजनाचा प्रसंग

संध्याकाळी दोन पैसे हातात पडल्यावर एक पैशाचे घरात लागणारे धान्य व भाजी घ्यायची, एक पैशाची दारू प्यायची. दारू पिऊन नशेतच रात्री आठच्या आसपास घरी पोचायचे घरी गेल्यावर घरातील त्यांची बायको मुले त्यांची वाट पाहत बसलेले असायचे. त्यांनी जे काही आणलं असेल ते शिजवून, दारूच्या नशेत देत असलेल्या शिव्या खाऊन, शिजलेला भात आमटी खाऊन झोपायचे. पुन्हा दुसऱ्या दिवशी पुन्हा त्याचीच पुनरावृत्ती. मुलांचे शिक्षण जेमतम सातवी किंवा आठवीपर्यंत, मुलींचे शिक्षण पाचवीच्या पुढे जातच नव्हते. कारण या खिंडीपाड्यापासून २-३ किलोमीटरपर्यंत एकही शाळा नव्हती, खिंडीपाड्यात कोणतीही गाडी तेव्हा येत नव्हती व पायी एवढा प्रवास करणे लहान मुलांना झेपत नव्हते, आईबाबाला शिक्षणाचे काही घेणेदेणे नव्हते तेव्हा ठरवले बस! झाला शोध पूर्ण. याच भागात शाळा सुरू करायची.

शाळा सुरू करायची ठरवल्यानंतर जागा कोण देणार? कारण खिंडीपाडा हा आदिवासी व झोपडपट्टीचा भाग असला तरी तो फार पूर्वी खोत यांची जहागिरी होती व खोताकडून परिसर व जंगल डोंगर त्यावेळी राजारामशेठ ओहोळ यांच्याकडे होती. जागेच्या मालकांकडून बोलणी करून जागा घेतली. तेव्हा ती जागा संपूर्णपणे डोंगर. त्या जागेवर जाण्यासाठी जो रस्ता होता तो संपूर्णपणे दलदलीचा. त्या जागेवर काही मुस्लीम समाजाच्या लोकांनी जबरदस्ती कब्जा करून घरे व गोदामे बांधली होती. ती जागा ज्या मालकाची होती त्याच्याकडे जेव्हा मी जागा मागितली तेव्हा त्या मालकाकडे



रमेश खानविलकरांसोबत राजारामशेठ विद्यालयाच्या भूमीपूजनाला उपस्थित नगरसेवक बाबूराव पाटील

Scanned with CamScanner

बरीच मोकळी जागा होती, पण मोकळी जागा मला शाळेसाठी देण्यास तो तयार नव्हता. त्याने एक आयडिया केली त्याने मला जी जागा दाखवली त्या जागेवर काही गुंडांनी व मुस्लीम समाजकंटकांनी दादागिरीवर घरे व गोदामे बांधून त्या मालकांच्या जागेवर कब्जा केला होता. म्हणजे ती जागा लुबाडली होती अशावेळी त्या जागेच्या मालकाने मला सांगितले की ही एक जागा आहे, पण त्या गुंडांनी व समाजकंटकांनी त्याच्यावर कब्जा केला आहे त्या जागेची किंमत एवढी होती. मला अर्धीच किंमत द्या. त्या जागेवरचे गुंडांचे अतिक्रमण हटवा व बांधा शाळा. ही गोष्ट सोपी नव्हती जागेचा मालक 'डाव' साधतो आहे हे माझ्या लक्षात आले. कारण त्या जागेवर ज्या गुंडांनी अतिक्रमण केले होते त्या जागेवर झोपड्या बांधल्या होत्या गोदामे बांधली होती ती सर्व गुंडमंडळींचीच गुन्हेगारी क्षेत्रात कुविख्यात होती. त्यांच्या बरोबर मुकाबला करून जागा ताब्यात घेणं शक्य नव्हते. एकूण भयानक परिस्थिती व मी एकटा ही गोष्ट आपल्याला शक्य नाही हे माझ्या लक्षात आले म्हणून मी परत जागा मालकाला विनंती केली. मालक आपल्याकडे खूप मोकळी जागा पडली आहे, डोंगर आहे, कोठेही जागा द्या. पण मोकळी असेल अशा ठिकाणी द्या, मग मला मालकाने दगडाची बंद पडलेली खदान दाखवली ती बघितली तर त्या खदानीचे रूपांतर तलावात झालेले होते. दिवसा साप फिरताना दिसत होते. अनेक पाण्यातील जनावरं, तलाववजा डबक्यात कीटक होते. अशा ठिकाणी जागा बांधण्याचे निश्चित केले व पैशाची व्यवस्था करण्याची तयारी केली. तेवढ्यात मालकाचा फोन आला की खदानीला तलाववजा डबक्यातील जागा तुम्हाला शाळेसाठी देता येणार नाही. मी का? विचारल्यावर मालक कारण सांगत नव्हते. अशावेळी माझा चौकस स्वभाव मला स्वस्थ बसू देत नव्हता. मी माहिती काढली तेव्हा समजले की तेथील नगरसेवकाला ही बातमी समजली की खानविलकर या ठिकाणी शाळा बांधणार आहे. त्या नगरसेवकांनी मालकाला आमिष दाखवले व त्या दाखवलेल्या तलाव वजा डबक्यात मातीचा भराव टाकून चाळी बांधू त्या मोबदल्यात तुम्हाला भरपूर पैसा देऊ. खानविलकरकडे काय आहे तो भिकारी आहे आणि काय शाळा बांधून तुम्हाला पैसे भेटणार आहेत आणि या विभागात शाळा बांधून कोण शिकणार आहे, मरू दे या समाजाला! त्यापेक्षा चाळी बांधून पैसा कमवू या. मी परत मालकाकडे गेलो त्या मालकाचा छोटा मुलगा खूपच चांगला होता. त्याला मनापासून वाटत होते शाळा व्हावी. कारण त्याने २/३ किलोमीटर चालत जाऊन शाळेत शिक्षण घेतले होते. किंमत बाजारभावाप्रमाणे सांगत असल्याने ती जागा घेता येत नव्हती. असे करता करता ५ ते ६ महिने गेले. या पाच ते सहा महिन्यात दिवसा-रात्री अनेक वेळा खिंडीपाडच्यात गेलो तेव्हा तेव्हा पुढारी लोक हसत होते काय, या जंगलात शाळा काढतात. कारण एका बाजूला या आडवाटेच्या जंगलात

झोपडपट्टीदादा व राजकारणी झोपड्या बांधून विकत होते, काही भागात दारूच्या भट्ट्या सुरू होत्या व संध्याकाळी सहानंतर या भागात कोणताही नवखा मनुष्य येऊ शकत नव्हता. अशा स्थितीत मला माझे अंर्तमन सांगत होते याच भागात शाळेची गरज आहे, पण पैसा नव्हता व मालक पैशाशिवाय मोकळी जागा देण्यास तयार नव्हता. शेवटी मी निर्णय घेतला मालकांनी जी अतिक्रमण झालेली जागा दाखवली आहे ते अतिक्रमण मोकळे करून तेथे शाळा बांधायची. हा निर्णय जिवावर बेतणारा होता, पण तरीही घेतला. मालकांशी पुन्हा बोलणी सुरू केली. तोपर्यंत या भयन्या कालावधीत त्या जागेवर अतिक्रमण वाढले होते. मालकाशी पुन्हा बोलणी केल्यानंतर मालकापेक्षा त्यांच्या 'भैकण्यांनी' काही अट घालून ज्या जमिनीवर संपूर्णपणे गुंडांची वस्ती, दारूच्या भट्ट्या, मुस्लीम समाजकंटकांची गोदामे, वेश्या व्यवसाय सुरू असलेला व जेथे संध्याकाळी ६.०० नंतर कोणीही बाहेरचा मनुष्य जाऊ शकत नव्हता अशा ठिकाणी अतिक्रमण काढून शाळा बांधण्याचे निश्चित केले. अशा जमिनीचा संपूर्णपणे गुंडांनी कब्जा केला आहे. ती जमीन मालकांनी दिली तीसुद्धा त्यावेळेच्या बाजारभावापेक्षा अर्ध्या किमतीत देण्याचे निश्चित झाले. १९९३ मध्ये ठरलेली रक्कम मालकाला अदा केली व जागेवर गेलो तर काय थोडीसुद्धा जागा मोकळी नव्हती. मुद्दाम संध्याकाळी ६.०० च्या नंतर गेलो, तर भयानक दृश्य होते. एकाबाजूला मुस्लीम, भैया लोकांच्या झोपड्या होत्या, एकाबाजूला काही गुंड दारूच्या भट्ट्या राबवत होते व दुसऱ्या बाजूला झोपड्यात वेश्याव्यवसाय सुरू होता. चालत चालत पुढे गेलो. संपूर्ण पाहणी केली व श्रीरामपाडाच्या टॉवरजवळ पोहचलो, तर तेथेही एक भट्टी सुरू होती. सहा ते साडेसहा फूट उंचीचे मुस्लीम गुंडांचे टोळके बसलेले होते. रात्री घरी आल्यावर मन खूप बेचैन झाले होते. प्रचंड भीती वाटत होती. मालकाला जे पैसे दिले होते ते क्लास करून जमवलेले होते व सर्वच पैसे देऊन झाले होते. आता प्रश्न होता शाळेची जागा मोकळी कशी करायची. त्यासाठी स्थानिक पुढाऱ्यांना विश्वासात घेणे आवश्यक होते म्हणून जे काही स्थानिक चांगली मंडळी होती त्या प्रत्येकाची भेट घेतली व माझा उद्देश मी त्यांना समजावून सांगितला. त्यांच्याकडे वेळप्रसंगी मदत करण्याचे आवाहन केले. प्रत्येकाला माझा मुद्दा पटला व या भागात शाळा झाली पाहिजे, असे जनमत तयार करण्यास मला यश आले. एकाबाजूला मी शाळा व्हावी म्हणून जनमत तयार करत असताना जिथे शाळा तयार होणार होती तेथील अतिक्रमित गुंड, समाजकंटक, बेश्या यांना समजले की कोणीतरी खानविलकर नावाचा पोरगा येथे शाळा काढणार आहे व आपल्याला येथून हाकलवून लावणार आहे. तेव्हा माझे वय होते २३ ते २४. शरीर अगदी हाडाचा सांगाडा. त्यामुळे मला बघितल्याबरोबर हा काय करणार? हे छोटसे पोरगं आहे हीच भावना प्रत्येकाच्या मनात येत

होती. त्यावेळी माझ्या सोबत फक्त दोनच व्यक्ती माझ्या मताशी सहमत व ठाम होत्या त्या म्हणजे नगरसेवक श्रीम. रोमला थापा व नगरसेवक बाबुराव पाटील. हे दोघे मला मुलासारखं मानून माझ्यावर खूप प्रेम करायचे. या दोघांना मी माझ्या मनातील बाब सांगितली व ही शाळा बांधताना कोणत्या अडचणी येणार हेही सांगितले. तेव्हा थापा मला प्रेमाने मास्तरजी म्हणायच्या, त्या सतत मला या विषयावर विचारायच्या व एका बाजूला असेही म्हणायच्या 'देखो जात जबार रंगे' 'सामने जो भी शत्रु ही वो खतरनाक है'. नगरसेवक बाबुराव पाटील यांना तर शैक्षणिक क्षेत्रात भरीव काम करण्याची पूर्वीपासून फारच इच्छा होती. त्यांनी अनेक शिक्षण संस्थांना मोलाचे मार्गदर्शन करून त्या संस्था मोठ्या केल्या व बाजूला झाले. त्या मोठ्या केलेल्या संस्थांवर कधीही हक्क दाखवला नाही किंवा कधीही त्या संस्था मी मोठ्या केल्या असेही म्हणाले नाही. हे दोघेही दीपस्तंभाप्रमाणे मागे उभे राहिले.

मुंबई महानगरपालिकेला मी घेतलेल्या शाळेच्या भूखंडावरील अतिक्रमण हटवून देण्याबाबत विनंती केली. अनेक अर्ज केले, पण कारवाई काहीच होत नाही. कारण हे अतिक्रमण हटू नये म्हणून काही राजकीय नेते या अतिक्रमित झोपडपट्टीवाल्यांबरोबर होते. या राजकीय लोकांबरोबर म.न.पा.च्या कर्मचारी वर्गाचा नेहमी संबंध येत असल्याने ते अधिकारीदेखील या राजकीय लोकांचे ऐकत होते. जवळजवळ ७ ते ८ महिन्यांनी तरी शाळेची जमीन मोकळी करून मिळावी म्हणून दिवसरात्र महानगरपालिकेच्या कार्यालयात चपला झिजवत होतो. शेवटी निर्णय घेतला. गनिमीकावा करायचा, राजकिय डावपेच करायचे. अशावेळी जसे मी विभागात काही लोकांना भेटून जनमत तयार केले, तसेच काही अधिकाऱ्यांना भेटून या भागात शाळेची आवश्यकता काय आहे व येथे शाळा का झाली पाहिजे हे समजावून सांगितले. प्रत्येक म.न.पा.च्या अधिकाऱ्याला माझे मत पटत होते. ते सर्व अधिकारी माझ्या मताशी सहमत होते. ते म्हणत होते, तू एवढासा छोटा पण तू कशी काय शाळा बांधणार? पण माझी धडपड बघून तेथील म.न.पा.च्या अधिकाऱ्यांनी देखील स्पष्ट सांगितले की, तुझी धडपड चांगली आहे, पण आमच्यावर राजकीय दबाव असल्याने आम्ही शाळेच्या नियोजित जागेवरचे अतिक्रमण नाही काढू शकत. त्या जागेवर कोणी अधिकारी काय, पोलिस गेले तरी त्यांना मारहाण होते. साधी बाब नाही व तेथे जे लोक आहेत ते उलट्या काळजाचे आहेत. त्यामुळे कोणीही अधिकारी ते अतिक्रमण काढण्याची हिंमत करू शकणार नाही. अशावेळी मला एस. विभागाचे रवी भोवर नावाच्या एका सज्जन अधिकाऱ्याने खूप मार्गदर्शन केले. मी रिकाम्या खिशाने पायपीट करताना त्याने कधी मला चहा दिला तर कधी जेवण. त्याने दिलेला चहा किंवा जेवण आयुष्याच्या शेवटपर्यंत मी कधीच विसरू शकणार नाही. ते अधिकारी सध्या कोठे आहेत हे मला माहीत नाही, पण आजही त्यांचे नाव स्मरणात आहे. तर या रवी भोवर अधिकाऱ्यांनी मला सांगितले की, आम्ही तुला मदत करणार, पण आम्हाला वचन दे. तेथे शाळाच बांधणार, चाळी बांधून विकणार नाही. कारण ते या काळात दिसली मोकळी जमीन की बांध चाळी हा धंदा जोरात होता. माझे स्वप्न



होते 'शाळेचे', मी लगेच त्यांना वचन दिले. मग त्यानंतर आमच्या मीटिंगवर मीटिंग झाल्या व ठरले ऑपरेशन शाळेची जमीन मोकळी करण्याचे. हे ऑपरेशन अतिशय गुप्त होते. कारण काही काही राजकीय लोकांची शाळा व्हावी ही इच्छा नव्हती. ऑपरेशन यशस्वी करण्यासाठी पोलिसांची मदत फार महत्त्वाची होती व एकाच वेळेला किमान १००-१२५ पोलिसांची आवश्यकता होती. अशावेळी एकाच वेळी एवढे पोलीस भेटणे शक्य नव्हते. मग म.न.पा.चे अधिकारी म्हणाले, आमच्या स्तरावर जी मदत हवी ती आम्ही करू. पण पोलिसांचे काय जर ऑपरेशन यशस्वी करायचे असेल तर १००-१२५ पोलिस हवेत. ते सुद्धा शस्त्रधारी, कारण समोर गुंड अमुन जीवघेणा हल्ला होणारच. मग माझा मोर्चा गेला पोलिसांकडे. मी स्वत: जाऊन पोलिस अधिकाऱ्यांना भेटलो. क्लासेस् चालवत असल्याने व २३/२४ वर्षांचा पोरगा म्हणून अनेक अधिकारी मला ओळखत होते. रोमला थापांना मार्गदर्शन करणारा, राजकीय अभ्यासक, पण छोटासा पोरगा म्हणून तेव्हा अनेक पोलिस निरीक्षक अधिकारी सुद्धा माझ्यावर प्रेम करत होते. पण प्रत्येकाला जेव्हा मी माझा ऑपरेशनबद्दल सांगितले तेव्हा प्रत्येकाने हात वर केले. कारण एकाच वेळेला १००-१२५ पोलिस देणे कोणालाही शक्य नव्हते. मग तेव्हा माझे वय २३/२४ असेल त्यावेळी ए.सी.पी.पासून पोलिस महासंचालकापर्यंत सर्वांना भेटलो. या सर्वांना भेटण्यात माझे १५ ते २० दिवस गेले. प्रत्येकाने नकार दिला शेवटी एकेदिवशी तेव्हा पोलिस महासंचालक श्री. अरविंद इनामदारसाहेब यांना भेटलो. हातातील निवेदन त्यांना दिले. त्यांनी ते वाचले माझ्याकडे बघितले व म्हणाले बस! काय रे तुझे वय काय? साहेब २३/२४ असेल. मग

Scanned with CamScanner

म्हणाले, या वयात हे काय शाळा काढणं साधी गोष्ट आहे. तरीही मी माझा आग्रह त्यांना समजावून सांगितला. संपूर्ण परिस्थिती, घरची परिस्थिती, विभागातील परिस्थिती व खिंडीपाडा भागात शाळेची आवश्यकता हे सर्व समजावून सांगितले. तेव्हा अरविंद इनामदार म्हणाले, हे बघ पोरा तुझं काम चांगलं आहे, कायद्याने मला सर्वच गोष्टी करता येणार नाहीत. पण तरीही एका चांगल्या कामाला हातभार म्हणून मी नक्कीच संपूर्ण पोलिस तुझ्या पाठीशी उभे करतो आणि मी लढाई जिंकली. त्यांनी लगेच त्यांच्या कनिष्ठ अधिकारी वर्गाला सूचना दिल्या व मला सांगितले तू भांडुप पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना भेट तुझे काम झालेच असेल. पण लक्षात ठेव तेथे शाळाच झाली पाहिजे. मी हो म्हटले, त्यांचे आभार मानले व ऑफिसमधून बाहेर पडलो. संध्याकाळी भांडुप पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षकाच्या ऑफिसमध्ये गेलो. आईटीकडून चिठ्ठी साहेबांकडे पाठवली साहेबांना लगेच आत बोलावले व म्हणाले, तू एवढासा तुझी ओळख मात्र वरपर्यंत कशी काय? मी मनात हसलो कारण कसली ओळख, हा तर सिध्दिविनायकाचा चमत्कार! अगेच दुसऱ्या दिवशी म.न.पा.च्या कार्यालयात गेलो. त्यांनाही सांगितले की, पोलिस बंदोबस्ताची व्यवस्था झाली आहे. त्या अधिकारी वर्गाला आश्चर्याचा धक्का बसला. त्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना सांगितले व शिपाई ओरडत बाहेर आला. खानविलकर कोण आहे? साहेबांनी बोलावले. मला भीती वाटली. कारण आता आणखी काय नवीन संकट उभे राहिलंय. मी साहेबांच्या केबिनमध्ये गेलो. साहेब उठून उभे राहिले व म्हणाले, तुझे वडील कोणी मोठे राजकारणी आहेत का? मी विचारले का? तेव्हा म्हणाले, जी गोष्ट अशक्य आहे ती तू 'बर' जाऊन करून आलास. तेव्हा त्यांना सांगितले, साहेब माझे वडील साधे कामगार आहेत, पण आता कंपनी बंद पडल्याने ते वॉचमेनगिरी करतात. त्यांना आश्चर्य वाटले व त्यांनी माझ्याबर कौतुकाचा वर्षाव केला व सर्व अधिकाऱ्यांना सांगितले. काहीही झाले तरी चालेल आपण सर्वांनी या पोराला मदत करायची. आपण राजकारणी लोकांची एवढी नियमबाह्य काम करतो, म्हणजे पाप करतो या पोराला मदत करून एक चांगलं काम करू या!

या सर्व ऑपरेशनची तयारी करताना शाळेच्या नियोजित ठिकाणी झालेल्या अतिक्रमणधारक व बेकायदेशीर धंदे करणाऱ्या गुंडांना या माझ्या हालचालींची व मी करत असलेल्या प्रयत्नांची माहिती झाली. त्यांच्यादेखील मीटिंगवर मीटिंग होऊ लागल्या स्थानिक नगरसेवक व राजकारणी लोकांकडे येणे-जाणे सुरू झाले. त्याचवेळी मी चौकस व गनिमीकाव्याचा अवलंबन केल्याने त्यांच्या व त्यांच्या बाजूने असणाऱ्या सर्व राजकारणी लोकांच्या हालचालींवर माझी नजर होती. यात एक मात्र झाले की सामान्य जनता, पोलिस अधिकारी मला लगेच माहिती पुरवत होते. त्याचवेळी माझ्यावर हल्ला करण्याची योजना काही गुंडांनी आखली म्हणून मी माझ्यासोबत माझे तेव्हा काही मित्र ठेवत असे. तेव्हा किमान ५/६ मित्र घेऊन फिरत असे. पण फिरताना मी पूर्ण काळजी घेत असे.

७/८ महिन्यांच्या कालावधीत सकाळी ७ ते ७.३० वाजता घराच्या बाहेर पडायचो व रात्री २ ते ३ च्या सुमारास घरी यायचो. तुम्हाला आश्चर्य वाटेल तेव्हा माझे अण्णा व आईदेखील मला सतत सांगायचे, नको कादूस शाळा, भांडुपची गुंडगिरी फार वाईट आहे. अण्णा दिवसभर फिरत असल्याने त्यांना कोणी कुठले लोक सांगायचे, तुझा पोरावर हल्ला होईल, त्याला मारून टाकतील, त्याला समजव. त्यामुळे या ७/८ महिन्यांत अण्णा व आई (अण्णा म्हणजे माझे वडील) फार काळजीत असायचे. रात्री जेव्हा २/३ वाजता घरी यायचो तेव्हा अण्णा बाहेर आरामखुर्ची टाकून बसलेले असायचे व आई घराच्या उंबरठ्यावर बसलेली असायची. भावंडे घरात झोपलेली असायची. त्यांना याबाबत काहीच समजत नव्हते. मग मी घरी आल्यावर आम्ही तिघही जेवायचो व झोपायचो. माझ्या जिवाचे बरेवाईट होईल ही चिंता नेहमीच त्यांना असायची, पण मी निश्चय केला होता, माझ्या जिवाचे काहीही होवो पण शाळा या ठिकाणी बांधणारच.

आणि ऑपरेशचा दिवस उजाडला... त्या दिवशी सुमारे ७ ते ८ म.न.पा.च्या गाड्या,३ जे.सी.पी, १००-१२५ पोलिस, ५० ते ७० म.न.पा. कर्मचारी, अधिकारी यांनी एकत्रितपणे शाळेची नियोजित जागा मोकळी करण्यासाठी व तेथील बेकायदेशीर व्यवसाय मुळापासुन नष्ट करण्यासाठी एकत्रितपणे कारवाई केली. म.न.पा. व पोलिस एकत्रितपणे एवढ्या प्रमाणात आल्याबरोबर गुंडांचे व समाजकंटकांचे धाबेच्या धबे हातात बाबू, तलवारी, घासलेटचे डबे, माचिस, शिगा, चाकू हातात जे शस्त्र मिळेल ते शस्त्र घेऊन सुमारे ३०० ते ३५० च्या जमाव समपा व पोलिसांवर चालून आला. अगदी अटीतटीचा प्रसंग उभा राहिला. मी पोलिसांच्या गराड्यात उभा होतो व समोर शस्त्रधारी जमाव चाल करून येत होता. कोणत्याही क्षणी काहीही घडू शकते अशी स्थिती निर्माण झाली. सर्वांच्याच मनात भीती निर्माण झाली व समाजकंटकांच्या जवानाच्या हातात घासलेटचे डबे होते. आणिबाणीच्या प्रसंगी म.न.पा.च्या अधिकाऱ्यांनी लगेच बाका प्रसंग ओळखून कारवाई थांबवली व अतिक्रमणधारकात भैये, मुस्लीम, गोदामधारक व अनियंत्रिक धंदे करणारे होते. त्यांना कारवाई करत नाही असे जाहीर करून सर्व मनपाचे कर्मचारी व पोलिस मागे फिरले. माझ्या पायाखालची जमीन सरकली. माझ्या शरीराचे पाणीपाणी झाले होते. आता आपली ७/८ महिन्यांची मेहनत फुकट गेली. आपली 'शाळा' होणारच नाही. हे अधोरेखित झाले. मलाही पोलिसांनी येथे थांबू नका, ताबडतोब घरी जा सांगितले. मला माझ्या घरी पोलिसांनी सोडले. ती संपूर्ण रात्र मी झोपलो नाही. आता सगळंच संपले होते. पुढे कोणताही मार्ग दिसत नव्हता. दुसऱ्या दिवशी परत म.न.पा. कार्यालयात गेलो. सर्व अधिकारी शांत होते. तेसुद्धा निराश झाले होते. शेवटी रवी भोवर हे अधिकारी म्हणाले, जर आपण काल ऑपरेशन सुरू ठेवले असते तर फार बाका प्रसंग आला असता. काहींचे जीव गेले असते व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन भविष्यात कधीच शाळा उभी राहिली नसती. अशी चर्चा सुरू असताना म.न.पा. कार्यालयात बातमी आली की कालच्या अतिक्रमणाबाबत समाजकंटकांनी माझ्या विरुद्ध मोर्चा काढला असून ७०० ते ८०० लोक आहेत. त्या मोर्च्याचे नेतृत्व स्थानिक नगरसेवक व एका मोठ्या राजकीय पक्षाचा मोठा नेता करत आहे. आता तो मोर्चा पोलिस ठाण्यावर गेला आहे. तेथून तो मोर्चा म.न.पा.च्या कार्यालयात येणार आहे. आता म.न.पा.च्या ऑफिसमधील सर्वांचेच चेहरे चिंताग्रस्त झाले. मला सांगितले गेले की, तू येथे थांबू नकोस ताबडतोब बाहेर जा. कारण जमावाने तुला पाहिले तर काही तरी विघटित घडेल. म्हणून मी म.न.पा.च्या कार्यालयातून बाहेर पडलो. पश्चिम भांडुप स्टेशनवर गेलो तेथून तडक दादरला पोहचलो. दिवसभर दादर परिसरात फिरत राहिलो. रात्री एक वाजेपर्यंत शिवाजीपार्क मैदानात बसून होतो. कारण मला समजले होते की, समाजकंटक माझा शोध घेत आहेत. रात्री शेवटची ट्रेन पकडून भांडुपला पोहचलो. तेव्हा मोबाईल नव्हता म्हणून माझा कोणाबरोबरही संपर्क झालेला नव्हता. घरी आलो तर पाहातो काय अण्णा व आई घराच्या बाहेर असलेल्या ओट्यावर बसलेली होती. आईचा चेहरा रडून रडून हिरमुसला होता. अण्णांचा चेहरा चिंताग्रस्त दिसत होता. त्या रात्री मी, अण्णा, आई, कोणीही एकमेकांशी काहीच बोललो नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा उठलो. तडक सिद्धिविनायकाचे मंदिर गाठले. तेव्हा सिद्धिविनायकाच्या गाभाऱ्यात जाऊन प्रत्यक्ष सिद्धिविनायकाला मी काय करणार व सिद्धिविनायकानी काय करायचे, त्याची कोणती मदत हवी हेसुद्धा सांगितले. जर मला अपयश आले तर कधीच मंदिरात प्रवेश करणार नाही व जर खरंच सिद्धिविनायक जागृत असेल तर तो साक्षात्कार देईल. त्या दिवशी सिद्धिविनायकाच्या गाभाऱ्यात जाऊन डोळ्यांतून अश्रू ढाळत परमेश्वराला बरं वाईट बोललो. त्याला हेही सांगितले की, काही वाईट काम करत नाही, बार काढत नाही, चाळी बांधत नाही व तुझा महिमा संपूर्ण जगात आहे व हे खरं असेल, सिद्धिविनायक जागृत देवता आहे हे मला माझी खात्री करायची म्हणून आवाहन करतो. हो जागृत आणि वर तेथे झाला. त्यावेळी माझ्या खिशात फक्त ३४ रुपये होते. घरात काही पैसे नाही, बँकेचे तर खातेच नाही व तडक बाहेर पडलो परत पोलिस ठाण्यात गेलो, परत वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटलो, म.न.पा.च्या अधिकाऱ्यांना भेटलो व परत सर्वांनी मदत करायची पण शेवटची हे मान्य केले. तेव्हा मी त्यांना विनंती केली. ऑपरेशनची रूपरेषा मी ठरवतो. आपण होकार देऊन सहकार्य करा. त्यानंतर पुन्हा एका नवीन ऑपरेशनची तयारी केली. याही वेळी मी एकटाच होतो. सोबत सहकार्य व मदत, सदिच्छा, आशीर्वाद अनेक लोकांचे होते. त्यातल्या त्यात 'रोमला थापा व बाबुराव पाटील' यांनी उपदेशपर सांगितले की कर

परत प्रयत्न! आणि मग लागलो पुन्हा एकदा कामाला. याच दरम्यान मला मारण्यासाठी गुंडांच्या टोळ्या माझा शोध घेत होत्या. शोध घेणारे सर्व हेडकुंडे मुस्लीम समाजातील गुंड होते व मी २३/२४ वर्षाचा हडकुळा. माझा शोध घेऊनही मी मात्र कोणालाच सापडत नव्हतो. म.न.पा., पोलिस ठाण्यात मात्र मी नियमितपणे जायचो, पण कधी जायचो, कुठून जायचो, कधी बाहेर पडायचो हे कोणालाच समजत नव्हते. त्यावेळी या समाजकंटकांनी मला नाव ठेवले हो 'चुहाँ'. ते अनेक ठिकाणी म्हणाले, हे खानविलकर चुहाँ कहासे आता है कहा जाता है, कुछ मालुम नही पडता. त्यांना मदत करणारे राजकारणीदेखील त्यांना सांगायचे, वो तुम्हारे हाथ

Scanned with CamScanner

नही आनेवाला. त्यावेळी मुंबईतील नामचित गुंड सलीम याने मला मारण्याची सुपारी घेतली होती म्हणून मीदेखील खूप सावधपणे प्रत्येक पाऊल उचलत होतो. पैशाची खूपच चणचण होती. उपाशी वणवण फिरत होतो. शक्यतो भांडुपच्या बाहेर असायचो. कारण काही गुंड माझा शोध घेत होते. अनेकांचे आशीर्वाद व सदिच्छा असल्या तरी लढाई एकटाच लढत होतो. शाळा उभी करण्याची शेवटची संधी असल्याने साम-दंड-भेद या नीतीचा अवलंबन करण्याचे, छत्रपती शिवाजी महाराजांच्या रणनीतीचा अवलंबन करण्याचे निश्चित केले. त्यासाठी या समाजकंटकांचे राजकारणी लोक फोडायचे. त्यांना बाजूला काढायचे ठरवले. कोणाला कोणाला मध्यस्थ टाकून त्या त्या राजकारणी माणसांची भेट घेतली, पण तरीही समाजकंटकांचा उद्रेग माझ्याविरुद्ध वाढत चालला होता. तेव्हा समजले की, एका मोठ्या राजकीय पक्षाचा मोठा नेता माझ्याविरुद्ध समाजकंटकांना अधिक भडकवत आहे. कारण या जागेवर कब्जा करण्यात त्याचा राजकीय नेत्याचा हात होता व त्या मोठ्या राजकीय नेत्याबरोबर माझे संबंध कधीच आले होते. अशावेळी मला शिवाजी महाराज व औरंगजेब बादशहाची भेट आठवली. मग इकडे तिकडे चौकशी केल्यानंतर त्या राजकीय नेत्याच्या जुन्या सहकारी कार्यकर्त्याकडे विषय काढून त्याची व माझी भेट निश्चित कर म्हणून विनंती केली. पण जेव्हा त्या कार्यकर्त्याने त्या राजकीय नेत्याकडे माझ्या भेटीकरिता शब्द टाकला तेव्हा तो राजकीय नेता लगेच भेट देण्यास तयार झाला. तो कार्यकर्त्याकडे म्हणाला, कोण हा खानविलकर? त्याला मला बघायचे आहे. त्याला अनेक गुंड शोधतात. तो कोणालाच सापडत नाही. त्याला आण माझ्यासमोर. कसा आहे खानविलकर ते मला बघायचे, पण त्या राजकीय नेत्याने अट घातली की खानविलकराला माझ्याकडे माझ्या घरी घेऊन यायचे तेसुध्दा रात्री १ ते १.३० नंतर. झाले रात्री २.०० वाजता त्या राजकीय नेत्याला भेटायचे ठरले, असा कार्यकर्त्याचा निरोप आला. त्याच वेळी तो कार्यकर्ता हेसुध्दा बोलला की, रमेश सावध रहा. हा राजकिय नेता मोठा असून तेवढाच कपटी, कारस्थानी व निष्ठूर आहे. व एवढ्या रात्री बोलावतो म्हणजे नक्कीच काही तरी घडणार. मी म्हणालो काही नाही होत, मी तर जिवावर उदार झालो आहे. बघू गप्प बसलो तर काहीच होणार नाही त्यापेक्षा काही झाले तरी समाजात नाव तरी होईल. शेवटी सिद्धिविनायकावर भरोसा. त्या फार मोठ्या राजकीय नेत्याच्या भेटीचा दिवस उजाडला. मी माझ्या वयाच्या ८/९ वर्षापासून सिद्धिविनायकाची व समोपमानाची नियमितपणे पूजा करत आहे. अगदी पाचवी, सहावीत असताना सकाळी शाळा असायची तेव्हा सकाळी ५.३० वाजता उठून देवाची पूजा करूनच शाळेत जायचो. त्यादिवशी देखील सकाळी देवाची पूजा केली व नरदासनगरच्या क्लासमध्ये जाऊन बसलो सकाळी ८.०० वाजता. त्याच क्लासच्या जागेवर आता सुप्रसिद्ध ईच्छापूर्ती महागणपतीचे देवस्थान आहे. त्या देवाच्या मूर्तीच्या जागेच्या ठिकाणी माझी बसण्याची खुर्ची व टेबल होते. तेथे तेव्हा सकाळपासून रात्री २.०० वाजता भेटल्यावर काय बोलायचे ठरवले व सावधगिरी म्हणून पोलिस ठाण्यातील माझ्या फार जवळ असलेले एक इन्सपेक्टर मित्र नायकोडी यांनाही सांगितले. इन्सपेक्टर नायकोडी व कार्यकर्ता याशिवाय ही भेटीची बातमी संपूर्णपणे गुप्त होती. रात्रौ १.३० वाजता मी व तो कार्यकर्ता त्या राजकीय व्यक्तीच्या घरी जाण्यासाठी बाहेर मेनरोडवर आलो. २० ते २५ मिनिटे रस्त्याची पाहणी केली व बरोबर २ वाजता त्या नेत्याने स्वत:च दार उघडले. मी घाबरत घाबरत दिवाणखान्यात गेलो. तेव्हा मला सारखी शिवाजी महाराज व अफजलखान यांच्या भेटीची कथा आठवत होती. मी निश्चय केला होता, वेळ पडली तर त्या घटनेची पुनरावृत्ती करायची. मी दिवाणखान्यात गेल्यावर राजकीय नेता आपल्या नेहमीच्या खुर्चीवर बसला होता. आम्ही बाजूच्या सोफ्यावर बसलो. त्याने मला संपूर्ण पाहिल्यावर म्हणाला, तुझं जेवढं नाव आहे तेवढा तू वाटत नाही. मी गप्प बसलो. त्याने टिपॉयवर ठेवलेली दारूची बाटली ग्लासात ओतून तीन ग्लास तयार केले. एक स्वत: घेतला, एक कार्यकर्त्याला दिला व तिसरा मला देऊ लागला. मी सांगितले, साहेब मी पीत नाही. त्याने आश्चर्य व्यक्त केले. पुन्हा आग्रह केला. कार्यकर्त्याने त्याला समजावले. साहेब हा घेत नाही. मग त्याने तो पेला रिकामा केला व दुसरा घेतला. कार्यकर्ता मात्र ग्लास हातात घेऊनच पिण्याचे नाटक करत होता. मग त्या राजकीय नेत्याने एक फोन लावला. तेव्हा घड्याळात वाजले होते २.३०. तो फोनवर कोणाशी बोलू लागला, पण तो ते काही बोलत होता ते माझ्याबद्दलच होते. व आता शेवट कसा करायचा असा शब्दप्रयोग होता. त्याचे फोन वरून बोलणे झाल्यावर फोन ठेवला व म्हणाला मा. मंत्री महोदय म्हणालेत, तू सांगून ऐकलास तर ठीक नाहीतर नेहमीची पद्धत वापरा. बोल जागा सोडतोस की मी माझी पद्धत वापरू. मी लगेच म्हणालो, साहेब किती पाहिजेत बोला? तुम्ही यातून लक्ष काढा? तेव्हा माझ्या खिशात १०/१२ रुपये असतील. कार्यकर्ता माझ्याकडे बघू लागला. मी साहेबांकडे व साहेब माझ्याकडे किती पाहिजेत बोला, असे बोलल्यावर साहेबांनी घेतलेली उतरली होती. मध्ये ५/६ मिनिटे गेल्यावर परत तो राजकीय नेता म्हणाला, म्हणजे तुझा प्लॅन काय आहे. मी मारलेला बाण बरोबर लागला होता. लगेच मी काकुळतेने भांडुप खिंडीपाडा या भागात शाळेची गरज, शाळेचे उद्घाटन तुमच्या हस्ते, मी लोकांना सांगणार तुम्ही शाळा बांधली, तुमच्यामुळे शाळा झाली, तुम्हाला शाळा कमिटीवर घेणार अशी अनेक आमिषे दाखवली. त्याला माझे म्हणणे पटू लागले, पण तरीही मला म्हणाला मला किती देणार? मी म्हणालो साहेब बोला ना? किती? तुम्ही म्हणाल तो आकडा? व माझा हात खिशाकडे गेला खिशात असलेले १०/१२

उर्वरीत पृष्ठ क्र. १०८ वर

Scanned with CamScanner

पृष्ठ क्र. ४८ वरून पुढे...

रुपये. त्याने एक मोठा आकडा सांगितला. मी तो मान्य केला व सांगितले साहेब तुम्ही सांगितल्याप्रमाणे पैसे पोच होतील, पण जागा शाळेसाठी मोकळी झालेल्या दिवशी. त्याने नकार दिला. अर्धी रक्कम आधी व अर्धी नंतर. मी मान्य केले व बाहेर पडलो त्यावेळी सकाळचे ५ वाजले होते. काही अंतरावर गेल्यावर कार्यकर्ता मला विचारू लागला काय रे? किती देणार साहेबांना? मी म्हटले? पंधरा? तो माझ्याकडे बघू लागला मी खिश्यात हात घालून एक छोटीशी चिरू बाहेर काढली. ती होती छोटी टेप. माझे सर्वात मोठे हत्यार. त्या कार्यकर्त्याला या थोड्याच दिवसात काम फुटले व त्याला समजायले. मी हे सर्व केले ते शाळेसाठी. माझा साहेबांना होता व तू काळजी करू नकोस तो ही आमची बच्चा सुरू होती तेवढा तेथे बाजूलाच त्याचा मतबुद्धी मुलगा सोफ्यावर अर्धवट झोपला होता. मध्येच उठायचा. मध्येच झोपायचा. जेव्हा आम्ही त्याच्या खोलीच्या बाहेर पडलो तेव्हा तो उठला होता व दरवाजापर्यंत सोडायला आला. त्यांची कार्यकर्ता त्याला मतबुद्धी मुलाला साहेबांकडे बोट दाखवून म्हणाला, हे सर आहेत. त्यांच्या शाळेत तुला टाकायचं आहे त्या मतबुद्धी मुलाचे वय साधारण ३०/३५ असेल. तो मतबुद्धी मुलगा माझ्यामध्ये सर्व ठिकाणी वाटेल तिकडे फिरायचा, माझ्या घरीसुद्धा अनेकदा घरी जायचा. तो मतबुद्धी मुलगा मला पुढे जेव्हा जेव्हा भेटायचा तेव्हा त्याचा हात घेऊन भेटायचा 'सर' 'सर' असे ओरडायचा. एवढा मोठा आवाज की स्टेशनरीज सर्व लोक पाहत बसायचे.

दुसऱ्या दिवसापासून माझ्याविरुद्ध भडकविलेले आंदोलन जोर होऊ लागले. तो बाईनगर, आपली राजनीती करू लागला. माझ अधून मधून त्याच्याशीसुद्धा फोनवर बोलणे होत होते व पुन्हा ऑफिसला शेवट करायचे ठरवले.

२४ डिसेंबर १९९४ या दिवशी 'ऑपरेशन शेवट' शाळेची जागा मोकळी करून ताब्यात घेण्याचे ठरवले. ठरल्याप्रमाणे म.न.पा. व पोलिस अधिकारी यांच्या बरोबर चर्चा झाली. त्यांनी आपापल्या वरिष्ठ कार्यालयीन अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली. व पुन्हा ७०-७५ म.न.पा. कर्मचारी, १५०च्या आसपास पोलिस, ४ ते ५ पोलिस व्हॅन, १०/१२ ट्रक हे सगळे एकत्रपणे शाळेच्या नियोजित ठिकाणी आले. नेहमीप्रमाणे गुंडांचा जमाव हातात भेटेल ते शस्त्र घेऊन पोलिस व म.न.पा. कर्मचारी वर्गावर चालून येऊ लागले. पण या वेळी पोलिस तयारीत होते. त्यांनी हल्ला असणाऱ्या जमावातील गुंडाना चारीबाजूने घेरून पटापटा पोलिस व्हॅनमध्ये टाकले. क्षणाचाही विलंब न करता गुंडांनी भरलेली पोलिस व्हॅन पोलिस स्टेशनच्या दिशेला जात होती. दुसऱ्या बाजूला म.न.पा.च कर्मचारी दारूचे अड्डे, वेश्याव्यवसाय, अतिक्रमित गोदामे, मटक्याचे अड्डे जमीनीच्या सातऱ्याने नष्ट करत होते. एक महानारी साई व चार पुरुष एक गंजिलचा डबा घेऊन खाजत माझ्या दिशेला चाल करत होते. पण अगोचिणीचा प्रसंग ओळखून इन्स्पेक्टर मोरे मध्ये पडले. तेवढ्यात त्या मोक्षतच्या त्या गुंडानी त्या म्हातारीच्या बाईच्या अंगावर रॉकेल टाकून जाळण्याचा प्रयत्न केला. पण पोलिस प्रत्येक अडीतीचीच्या प्रसंगाला तोंड देत होते तसच यावेळी सुद्धा तत्काळ त्या बाईला बाजूला खेचले. त्या गुंडांनी ताब्यात घेतले व येणारा बाका प्रसंग पोलिसांमुळे टळला. सकाळी १० वाजता सुरू झालेली कारवाई सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कोणाही कानाही न खाता-न पिता अखंडपणे सुरू होती. प्रत्येक कर्मचारी वर्गाच्या मनात होते येथे 'शाळा' झाली पाहिजे. संध्याकाळी ५ वाजेपर्यंत नियोजित शाळेची जागा मोकळी केली गेली. त्या ठिकाणी असलेले अतिक्रमित साहित्य हटवले गेले. दंगा करणाऱ्या, गोंधळ घालणाऱ्या गुंडांना जागेवर अटक करण्यात आली. संध्याकाळपर्यंत पोलिस लॉकर पूर्ण भरले. मध्येच पोलिसांवर म.म.न.पा. कर्मचाऱ्यांवर चाल करून येणाऱ्या जमावावर पोलिसांनी चार्ज केला. एका बाजूला पोलिस आपली कामगिरी करत होते. तर दुसऱ्या बाजूला म.न.पा. कर्मचारी अतिक्रमण नष्ट करत होते. शेवटी ५ नंतर कारवाई पूर्ण झाल्याने व शाळेची जमीन मोकळी झालेली पाहिल्यावर मन तृप्त झाले. या दरम्यान कोणताही राजकीय पुढारी मध्ये आला नाही. कारण त्यांना बंदोबस्त अगोदरच केला गेला होता. त्याच दिवशी पोलिस संरक्षण असल्याने मी काही कामगार लावून तारेचे कंपाऊंड टाकून घेतले. हिवाळ्याचे दिवस असल्याने गार लवकर होत असल्याने ६ ते ६.३०च्या आसपास आम्ही तेथून निघून गेलो. दुसऱ्या दिवशी दुपारी साधारणपणे २ ते २.३०च्या दरम्यान मी एक पोलिस अधिकारी व १४ पोलिस शिपायांच्या संरक्षणात परत जागेवर जाऊन मोकळ्या जागेची पाहणी केली. पोलिसांच्या संरक्षणात पाहिल्याबरोबर ५/६ मिनिटांत १५०च्या आसपास गुंडाचा जमाव हातात तलवारी व शिगा, दांडके घेऊन आमच्यावर चाल करून येऊ लागले. एवढा मोठा जमाव पाहिल्याबरोबर माझ्या बरोबर असलेले पोलिस अधिकारी व पोलिस शिपाई पळू लागले. मलाही त्याच्यामागे पळावे लागले. माझा मागे शस्त्रधारी जमाव हा एखाद्या सिनेमासारखा प्रसंग होता. एवढ्यात पळणाऱ्या पोलिस अधिकाऱ्याला मी म्हणालो, अहो साहेब कमरेचे पिस्तुल काढून गोळीबार करा. शांतलेल्या अवस्थेत त्या पोलिस अधिकाऱ्याला आपल्या कमरेला पिस्तुल आहे याचा विसर पडला होता. धावता धावता त्याने पिस्तुल काढले व माझ्या पुढे येऊन उभा राहिला. पिस्तुलाचे तोंड जमावाकडे व त्या पोलिस अधिकाऱ्याच्या मागे मी व माझा मागे पोलिस शिपाई. त्या पोलिस

अधिकाऱ्याने पिस्तुल रोखून उलट्या पावलाने आम्ही मागे सरकत होतो. जमाव घाणेरड्या भाषेत शिव्या घालत येत होता. पुन्हा त्या पोलिस अधिकाऱ्याने हवेत गोळीबार केला व मला ओरडून म्हणाला, पळ. आम्ही एकत्र पळू लागलो व जमाव आमच्या मागे. आपल्यापैकी जो कोणी सापडेल त्याची खांडोळी निश्चित. १५/२० मिनिटे हे सुरू होते. तेवढ्यात कोणी १०० नंबरला फोन लावला देव जाणे. दोन पोलिस व्हॅन भरून पोलिस घटनास्थळावर दाखल झाले. धडाधड पोलिस खाली उतरले. पोलिस व्हॅन व एवढे पोलिस बघितल्यावर जमाव पळू लागला. आता उलट झाले होते. जमाव पुढे व जमावाच्या मागे पोलिस. शेवटी झोपडपट्टी होती. जमाव पुढे कुठे मार्ग भेटेल तिकडे पळू लागला. माझ्या संरक्षणासाठी आलेला पोलिस अधिकारी मात्र पोलिस व्हॅनमध्ये डोक्याला हात लावून गर्भगळीत होऊन बसला होता व मी त्यांच्या समोर उभा राहिलो. तर त्यांनी मला दंडवत नमस्कार केला व म्हणाले, अरे आज तर मेला असतास व आम्हीसुद्धा. त्यांची ही स्थिती बघून मी हसू की रडू असे झाले होते. त्यानंतर त्याप्रसंगात अचानक दोन पोलिस व्हॅन पोलिस गच्च भरून कोठून आल्या, हे कधीच समजले नाही. कारण साधारणपणे १०० नंबरला कॉल केल्यानंतर एखादी व्हॅन येते. येथे १०० नंबरला कॉल कोणी केला, दोन व्हॅन १५ ते २० मिनिटांत तयारीत आल्या हासुद्धा त्या सिद्धिविनायकाचा चमत्कार.

दुसऱ्या दिवशी संकष्टी चतुर्थी होती. तारीख होती दि.२२ डिसेंबर १९९४. दिवसभर पुढे काय करायचे, शाळेच्या कंपाऊंड संदर्भात व शाळा उभारणीच्या दृष्टिकोनातून काय करायचे या विचारात दुपार झाली. संध्याकाळी सिद्धिविनायकाचे दर्शन झाले. ७.३० च्या आसपास मंदिरात जाऊन नारळ दिला. घरी आलो संकष्टीची पूजाअर्चा करून सिद्धिविनायकाला नैवेद्य दाखवला. साधारणपणे रात्री ९.३० ते १०.०० च्या दरम्यान जेवण करून उपास सोडला व सरच्या फोनवर एका व्यक्तीचा फोन आला. १०० ते १५० लोक मोकळ्या झालेल्या जागेवर झोपड्या उभारण्याचे काम करतात व आम्ही उभारलेल्या बांबमेनला दम देतात. हे ऐकून अंगाची आग आग झाली. राग मस्तकात गेला. १०.३०च्या आसपास दोन मित्रांना सोबत घेतले आणि त्यांनी सोबत एक डॉबरमन जातीचा मोठा काळ्या रंगाचा कुत्रा घेतला. साधारणपणे सोनापूरक डून खिडीपाडयामागे लपत छपत सावधपणे आम्ही शाळेच्या मोकळ्या झालेल्या जागेवर गेलो. तर काय आश्चर्य संकष्टी असल्याने सुमसाम आकाशात चंद्र दिसत होता. चंद्राचा मंद प्रकाश पसरला होता, पण सर्वत्र शांतता होती म्हणून मी माझे दोन मित्र व सोबतचा कुत्रा. मोकळ्या झालेल्या जागेच्या मध्यभागी गेलो. मी तिथे ठेवलेला बाँबमेन कुठे दिसत नव्हता व मी त्याला आवाज दिला तर आपण आलो हे माहीत पडेल. शिवाय फोन करणाऱ्या व्यक्तीने सांगितले होते, १०० ते १५० लोक झोपड्या ठोकतात, पण येथे तर जागेवर बाँबमेन पण नाही, माणसे पण नाहीत. मनात चर्रर झाले म्हणून मी माझ्या दोन मित्रांना जागेच्या एका बाजूला पाठवले व मी जागेच्या एका बरच्या टोकाला हातात कुत्रा घेऊन पुढे झालो. संपूर्ण जागा फिरलो तरी कुठे कोणी दिसले नाही. आजूबाजूला लोकवस्ती जवळ नसल्याने कोणाचीही ये-जा नव्हती. तेवढ्यात जागेच्या खालच्या बाजूला असलेले दोन मित्र मोठ्याने ओरडले. सर पळा व ते त्या अंधारात पळत होते व त्यांच्या मागे काही लोक तलवारी व दांडके घेऊन धावताहेत, असे मला अंधुक प्रकाशात दिसले. त्यांना पाहतो न पाहतो तेवढ्यात मी जिथे उभा होतो तेथे चारी बाजूंनी समोर ७० ते ८० लोकांनी मला घेरून टाकले. प्रत्येकाच्या हातात शिगा, बांबू, दांडके, तलवारी होत्या. त्यात ७/८ लोक सहा ते साडेसहा फूट उंचीचे धिप्पाड होते. त्यातून एकाने माझ्या हातात असलेल्या डॉबरमनच्या अंगावर दांडका मारल्यावरोबर डॉबरमन ओरडत सुसाट पळून

गेला. आता मी एकटाच व चारीही बाजूंनी ७० ते ८० लोक घाणेरड्या शिव्यांचा वर्षाव करत येत होते. आजूबाजूला पळून जाता येईल असा रस्ता नव्हता. समोर मृत्यू 'आ' वासून उभा होता. अकरा ते सव्वाअकरा वाजून गेले होते. मनात अण्णा व आईचे स्मरण केले व मनात म्हणालो, आज संकष्टी, सिद्धिविनायका, मी तर आता मरणार. हे लोक मला काही जिवंत सोडणार नाहीत, पण माझ्या आईवडिलांकडे लक्ष ठेव व सिद्धिविनायकाचे स्मरण करत असतानाच मागून कोणीतरी शिग डोक्यात मारली. ती बरोबर डोक्याच्या मध्यभागी लागली. तेवढ्यात समोरून काही लोकांनी डाव्या हातावर तलवारीचा वार केला. हात एका तलवारीच्या घावात मोडला. आणखी कोणीतरी दोन्ही पायावर शिगा मारल्याबरोबर मी आडवा पडलो, मग तो ७०/८० लोकांचा जमाव माझ्या शरीरावर घावावर घाव घालू लागले. मी तडफडत होतो व क्षणाक्षणाला मृत्यूच्या दारात जात होतो व आता सर्व संपले असे मनात समजून आकाशाकडे पाहिले व मी बेशुध्द झालो. मी बेशुद्ध झालो, पण जमावाला वाटले की मी मेलोच. कारण माझ्या शरीराची हालचाल होत नव्हती. मी मेलो आहे हे समजून जमाव पांगू लागला. तेवढ्यात जे मित्र पळून गेले होते त्यांनी आणखी लोकांना जमा करून शाळेच्या जागेवर घेऊन आले. समोरून लोक येत आहेत व मी मेलो आहे हे बघून मला मारणारे लोक पळून गेले. मित्रांनी आणलेल्या लोकांनी मला उचलून तुळशितपाडयामागे खाली रिक्षास्टैंडवर आणले.

Scanned with CamScanner

रात्रीचे दीड ते दोन वाजले होते. रिक्षा सापडत नव्हती म्हणून मला काही लोकांनी हातगाडीवर टाकले व गावदेवी येथे खाजगी हॉस्पिटलमध्ये आणले, पण तेथे माझ्यावर उपचार करण्याचे नाकारले. गाडी नाही, रिक्षा नाही पुढे काय करायचे. मला हातगाडीवर घेऊन येणारे सर्वच माझ्या परिचयाचे व मी त्यांना मदत केलेली असे होते. त्यामुळे त्यांचा जीव कासावीस झाला होता. गावदेवीगेड येथील खाजगी रुग्णालयात माझ्यावर उपचार करण्यास अतिरिक्तस्राव होत असल्याने नकार देण्यात आला. मला जे लोक हॉस्पिटलमध्ये घेऊन गेले होते त्यांचा चेहरा चिंताग्रस्त झाला. आता पुढे काय करायचे हा प्रश्न सर्वांनाच पडला. कारण बाहेर रस्त्यावर कोणतेही वाहन नव्हते व मला मोठ्या हॉस्पिटलमध्ये नेण्याशिवाय गत्यंतर नव्हते. अशावेळी सायन हॉस्पिटल हा एकमेव पर्याय होता. वाहन नसल्याने सायन हॉस्पिटलपर्यंत पोहचायचे कसे? हा प्रश्न सर्वांनाच पडला होता. तेवढ्यात माझे मित्र व ज्यांनी मला शाळेसाठी जागा कायमस्वरूपी दिली होती ते मालक अतुल ओहळ आपली गाडी घेऊन हॉस्पिटलपर्यंत पोहचले. अतुलशेठ गाडी घेऊन आलेले पाहिल्यावर सर्वांच्या जिवात जीव आला. माझ्या सर्व इतर मित्रांनी घाईघाईने मला उचलून त्यांच्या गाडीत टाकले. लगेचच अतुलशेठना म्हणाले, शेठ गाडी सायन हॉस्पिटलला घ्या. अतुलशेठ म्हणाले, गाडी कोण चालवणार मला गाडी नीट चालवता येत नाही. कोण ड्रायव्हर आहे का? सरांना लागले म्हणून मी हिंमत करून कशी बशी इतपर्यंत गाडी घाबरतच चालवत आणली, पण सायनला जायचे तर मला मेन रोडला गाडी चालवता येणार नाही. आता काय करायचे मी तेव्हा सुध्दा बेशुद्ध होतो व रक्तस्राव थांबत नव्हता. परिस्थिती बिकट होती मग सर्वांनी मनाची तयारी केली अतुलशेठ म्हणाले, चला बघू काय होईल ते होऊ द्या. मी गाडी चालवेन व त्यावेळी अतुलशेठने गाडी चालवली. छोट्या गाडीत सर्वजण बसले. रात्रीचे ३ ते ४ वाजले होते. रस्ता मोकळा असल्याकारणाने अतुलशेठने गाडी भरधाव सुरू केली ती डायरेक्ट सायन हॉस्पिटलच्या गेटवरच थांबली. लगेच क्षणाचा

विलंब न करता सर्वांनी मला उचलून हॉस्पिटलमध्ये नेले व माझ्यावर उपचार सुरू झाले. तात्काळ मला ऑपरेशन थेएटरमध्ये नेले. तिकडे अतुलशेठ व मंडळी धावाधाव करीत होते. सकाळी ६.००च्या दरम्यान मी हळूहळू शुद्धीवर येऊ लागलो. व कोणाचेही चेहरे स्पष्ट दिसत नव्हते. तेवढ्यात भांडुप पोलिस ठाण्याचे पथक व इतर बरेच ओळखीचे लोक पोहचले. माझ्यावर उपचार सुरू असताना माझ्या मित्रांनी व अतुलशेठने माझ्यावर हल्ला झाला व मी जखमी अवस्थेत सायन हॉस्पिटलला आहे, ही बातमी रोमला थापा व बाबुराव पाटील यांच्यापर्यंत पोहचवली. तोपर्यंत माझ्या घरी कोणालाही काहीच माहीत नव्हते. कोणीतरी सकाळी घरी जाऊन मी जखमी असल्यामुळे सायन हॉस्पिटलला आहे, हे सांगून अण्णा व आईला हॉस्पिटलमध्ये घेऊन येण्यासाठी गेले. सकाळी ८.०० वाजता डॉक्टरांनी मला ऑपरेशन थेएटरच्या बाहेर काढले व माझ्या बरोबर असणाऱ्या लोकांना सांगितले की, आता आवश्यक ते उपचार आम्ही केले आहेत व पेशंट पूर्ण शुद्धीत आल्याशिवाय तुटलेला हात जोडता येणार नाही. माझा एक हात कोपरापासून तुटून लोंबकळत होता. दोन्ही पायांना संपूर्ण प्लास्टर होते. तुटलेला हात बँण्डजपट्टीने झाकला गेला होता. माझ्यावर उपचार सुरू असताना कोणीतरी मा.आमदार लीलाधर डाके यांच्या घरी जाऊन माझ्यावर हल्ला झाला व हा हल्ला पूर्वनियोजित व राजकीय होता म्हणून त्यांना तत्काळ हॉस्पिटलमध्ये बोलावले. जेव्हा मला वॉर्डात प्राथमिक उपचार करून आणले तेव्हा सभोवती खूप लोक होते. माझे सर्व हितचिंतक होते, आमदार होते, नगरसेवक होते, शाखाप्रमुख होते. खूप गर्दी होती, पण माझ्या घरातील मात्र कोणीच नव्हते. मला कोणालाही चेहरा स्पष्ट दिसत नव्हता, पण कानाने सर्वांचे आवाज ऐकू येत होते, समजत होते. शरीर बँण्डेजमध्ये असताना मी कोणालाही ओळखण्याचा प्रश्नच नव्हता. माझ्या सभोवती असणाऱ्या लोकांना कोणी तरी घरी सांगा असा निरोप दिला. तेव्हा कोणी तरी त्या गर्दीत बोलले घरी माणसे पाठवलेली आहेत. अकराच्या सुमारास घरातून आई व अण्णा आले. तोपर्यंत मी शुद्धीवर आलो होतो व माझ्या सर्व मित्रांनी डॉक्टरांशी बोलून निर्णय घेतला की, मला तत्काळ नांगले उपचार मिळावेत म्हणून सायन हॉस्पिटलमधून खाजगी रुग्णालयात हलवावे. त्यामुळे मला मुलुंडच्या आदिवासी हॉस्पिटलमध्ये अँब्युलन्समधून हलविण्यात आले. दुपारी ४ ते ५ च्या आसपास मला सर्व मित्रांनी व रोमला थापा यांनी आदिवासी हॉस्पिटलमध्ये हलविले. संध्याकाळी आणखीन बातमी पोहचली की, मी वाचलो आहे ही बातमी माझ्यावर हल्ला करणाऱ्या लोकांना समजलेली आहे व मुंबईतील विख्यात गुंड सलीम व त्याचे साथीदार मला हॉस्पिटलमध्ये येऊन ठार मारणार आहेत. त्यावेळी माझा सर्व मित्रांनी व रोमला थापा यांनी सुमारे ५० ते ६० लोकांना दिवसरात्र हॉस्पिटलच्या परिसरात माझी देखरेख

करण्यासाठी व संरक्षणाकरिता नेमले. नंतर ३/४ दिवसांनी माझ्या हातावर मोठे ऑपरेशन झाले सुमारे २७ टाके टाकून हातामध्ये रॉड टाकून हात जोडण्यात आला. दोन्ही पायांवर उपचार करण्यात आले, पण दोन्ही पाय माझे लोखंडी शिगांनी चेंदलेले होते. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी रक्तवाहिन्या दबल्या गेल्या होत्या. प्रचंड प्रमाणात वेदना होत होत्या. डोक्यात टाके टाकण्यात आले होते. शरीरावर सात ते आठ ठिकाणी टाके व संपूर्ण शरीर पुन्हा बँडिजमध्ये अशा स्थितीत सुमारे २६ दिवस मी हॉस्पिटलमध्ये राहिलो. डॉक्टर म्हणाले किमान तीन महिने तुम्ही चालू शकणार नाही. संपूर्ण विश्रांती घ्यावी लागेल. २६ दिवसांनंतर घरी आलो. या २६ दिवसात त्यावेळी मला अनेक हितचिंतक, स्नेही, राजकारणी, पोलिस अधिकारी, मित्र या लोकांनी हॉस्पिटलमध्ये धीर दिला व शाळा बांधण्याचा नाद सोडून दे, असा सल्ला दिला. घरी आलो तोसुध्दा उचलून. घरी येऊन ४/५ दिवस झाले होते. या ४/५दिवसांत सर्व घटना आठवत होत्या व एवढे सर्व झाल्यावर शाळा बांधायची नाही हे मला पटत नव्हते. त्या दरम्यान हॉस्पिटलमध्येही मी शाळेच्या जागेची व तेथील परिस्थितीची माहिती घेत होतो. तेव्हा समजले की, मी हॉस्पिटलमध्ये असताना माझ्या काही पोलिस अधिकारी मित्रांनी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाल्याने माझ्यावर हल्ला करणाऱ्या काही लोकांना अटक केली होती व काही लोकांना शोध घेत होते. पोलिस हल्लेखोराच्या मार्गावर असल्याने शाळेच्या मोकळ्या जागेवर कोणीच येत नव्हते. शिवाय आणखी काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून त्या शाळेच्या जागेवर पोलिस संरक्षणदेखील ठेवण्यात आले. या सर्व प्रकाराची माहिती घेतल्यावर मी पुन्हा निश्चय केला की हीच वेळ आहे शाळेचे बांधकाम करण्याची. या सर्व प्रकारात फेब्रुवारी महिना उजाडला. मी आलेल्या संधीचा फायदा घेण्याचे निश्चित केले. पोलिस ठाण्यात अर्ज केला व मला स्वत: पोलिस संरक्षण घेतले. मला माझ्या रक्षणासाठी एक पोलिस अधिकारी व चार पोलिस शिपाई शस्त्रधारी देण्यात आले. या पोलिस संरक्षणात मी पुन्हा हल्ला झाल्यानंतर दोन महिन्यांनी त्या जागेवर गेलो. हाताला, डोक्याला, पायाला बँण्डेज व माझ्या रक्षणासाठी माझ्या अवतीभवती पोलिस. अशास्थितीत शाळेच्या मोकळ्या जागी उभा राहिलो व सिद्धिविनायकाचे स्मरण केले व ठरवले की जागेवर भूमिपूजन करून शाळेचे बांधकाम करायचे. घरातून पूर्ण विरोध होता. कारण एकदा वाचलो पुन्हा काय होईल, पण मला माझ्या परमेश्वरावर पूर्ण विश्वास होता. लगेच तसाच मी म.न.पा. कार्यालयात गेलो. तिथे संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले, साहेब शाळेचे काही वर्ग बांधतो व फेब्रुवारी महिना आहे. ९ जूनला शाळा सुरू करायची आहे, पण वेळ कमी आहे. बांधकामाची परवानगी व म.न.पा.च्या कार्यवाहीस नियमाप्रमाणे विलंब लागतो. फक्त दोन वर्ग बांधून व शाळा सुरू करतो. कृपया मदत व सहकार्य करा. म.न.पा.च्या अधिकाऱ्याला आश्चर्य वाटले. हा माणूस मरता मरता वाचला तरी त्याच्या डोक्यातून शाळा बांधण्याचे वेड जात नाही. म.न.पा.च्या अधिकाऱ्यांनी सहकार्य करायचे म्हणजे देवाणघेवाण करावी लागते. तेव्हा मी त्यांना स्पष्ट विचारले व अधिकारी म्हणाले, आम्हाला काही नको बस तुमची शाळा सुरू होऊ दे! झाले. सुरुवात चांगली झाली होती, पण शाळेच्या बांधकामाला लागणारे रेती, विटा, सिमेंटचे काय, मजुरांची मजुरी कोठून द्यायची, खिशात पैसे नव्हते. माझ्या हातातील एक अंगठी विकली. थोडे मजुरांचे पैसे हातात आले. काही पैसे मित्रांकडून घेतले व कास्पर्प्लेन संस्थेकडे मटेरियल मागितले व हे सर्व करताना मार्च महिना संपला. हातात एप्रिल व मे असे दोन महिने होते. कास्पर्प्लेनचे अधिकारी कार्यालयीन प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय मटेरियल द्यायला तयार नव्हते, पण माझी धडपड बघून व गेल्या वर्षभरात घडलेला सर्व प्रकार भांडुपमध्ये प्रत्येकाच्या घरात माहीत झाला होता. हे सर्व कास्पर्प्लेनच्या अधिकाऱ्यांनाही माहीत होते, पण कायदा व नियम आडवा येत होता. त्यावेळी शिवाजी शिंदे, दत्तू पवार, राणेसारख्या कास्पर्प्लेनच्या अधिकाऱ्यांनी नियमाच्या पलीकडे जाऊन शाळा झालीच पाहिजे यासाठी काही प्रमाणात रेती, विटा, सिमेंट उपलब्ध करून दिले. आणि भोजकी मित्रमंडळी, रोमला थापा, बाबुराव पाटील यांच्या उपस्थितीत शाळेचा भूमिपूजन सोहळा करून शाळेचे वर्ग बांधण्यास सुरुवात केली. एका खडकाळ डोंगरावर येथे कोणाला नीट चालताही येत नव्हते अशाठिकाणी सिद्धिविनायकाची पूजा करून ज्याठिकाणी मी माझे रक्त सांडले होते तेथेच शाळेचा पहिला वर्ग बांधायला घेतला. सोबत पोलिस संरक्षण होते त्यामुळे सुरुवातीला काही दिवस काही त्रास झाला नाही. एप्रिल, मे महिन्यात शाळेचे तीन वर्ग बांधून झाले.

Scanned with CamScanner

सुरुवातीला १३५ विद्यार्थ्यांनी लहान शिशु, मोठा शिशु, इयता पहिली व पाचवीत प्रवेश घेतला होता. शाळेची फी फक्त ३० रुपये. प्रवेश घेतलेल्या कोणत्याही विद्यार्थ्यांच्या पालकांकडून एकही रुपया डोनेशन घेतलेले नाही. तीन वर्ग सुरू झाले. जून महिना उजाडला. पाऊस सुरू झाला. शाळेचे उद्घाटन करून शाळा सुरू करायचे ठरविले. त्यावेळी शिवसेना-भाजपाची सत्ता होती. स्थानिक आमदार मंत्री होते. पण शाळेची जागा, माझ्यावरील हल्ला, शाळेला विरोध, विरोधकांना मदत अशा अनेक कारणांमुळे त्यांच्यामध्येही मतभेद झाले होते. त्यामुळे कोणी मोठी व्यक्ती उद्घाटनाला मिळत नव्हती किंवा कोणी उद्घाटन करायला वेण्यास तयार नव्हते. १९ जून ही तारीख उद्घाटन करायची ठरली, पण १८ जून संध्याकाळपर्यंत उद्घाटनकर्ता सापडत नव्हता. कोणीही पुढारी या ठिकाणी येऊन उद्घाटन करण्याची हिंमत करत नव्हता. पुन्हा एकदा सिद्धिविनायकाचे स्मरण करून त्यांनाच उद्घाटन करण्यासाठी या म्हणून आवाहन केले. आणि त्या रात्री विनाआमंत्रण पूर्वनियोजित वेळ न घेता रात्री ११.३० वाजता राज्यमंत्री गुलाबराव गावंडच्या पी.ए.चा फोन आला की, मंत्रीमहोदय शाळेच्या उद्घाटनाला येणार आहेत. मलाही आश्चर्य वाटले. त्यांना तर मी आमंत्रण दिले नव्हते. मी कुठेही जाऊ शकत नव्हतो. त्यावेळीही माझ्या हाताला व पायाला प्लास्टर होते, मग मंत्री कसे तयार झाले. १९ जून उजाडला. सकाळी ९.०० वाजता शाळेच्या अवतीभवती पुन्हा पोलिसांचा गराडा. मी शाळेत पोहचलो. एवढे पोलिस पाहिल्यावर माझ्या मनात चर्रर्र झाले. आता आणखी काय घडले? पुढे गेलो तर माहीत झाले की मंत्री येणार म्हणून एवढे पोलिस. मी मंत्र्यांना घाबरण्यासाठी हारही आणला नव्हता. लगेच कोणीतरी स्टेज बांधणारा शोधला. त्याने एका तासात कसाबसा स्टेज बांधला व २/३ तासांत चमत्कार घडावा अशातऱ्हेने स्टेज, खुर्च्या, साहित्य सर्व काही जागेवर पोहचले. मंत्री महोदय आपल्या लवाजम्यासह आले. अगदी थाटाने माझ्या स्वप्नाचे, माझ्या शाळेचे सुमारे ४०० ते ५०० लोकांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले. सर्वांनाच आश्चर्य वाटले. मंत्री आल्याने माझी पत वाढली. पोलिस अधिकारी मला सलाम करू लागले. हे आश्चर्य कसे झाले कुणास ठाऊक? कसे झाले पण झाले. १९ जूनला दुपारी प्राथमिकचा वर्ग भरून शाळा सुरू केली. त्या रात्री सुधाने दोन वर्षांनंतर प्रथमच मी शांत झोपलो व सिद्धिविनायकाला म्हटले, परमेश्वरा आता माझा जिवाचे काही झाले तरी चालेल, शाळा सुरू झाली.

शाळेचे उद्घाटन झाले, पण शाळेला महाराष्ट्र शासनाची मान्यता किंवा परवानगी नव्हती. शासनाची परवानगी/मान्यता न घेता शाळा सुरू करणे जरी चुकीचे असले तरी शाळा सुरू करणे आवश्यक होते. शाळा सुरू केल्यानंतर शाळेला महाराष्ट्र शासनाची परवानगी/मान्यता घेण्यासाठी प्रयत्न सुरू केले. रितसर आवश्यक कागदपत्रांसह शिक्षण विभागाकडे प्रस्ताव सादर केला, पण इथेसुद्धा अनेक अडचणी येऊ लागल्या. तेव्हा शिक्षणमंत्री होते रफिक झकेरिया. त्यांना भेटलो एकूण परिस्थिती समजून सांगितली व प्रस्ताव सादर केलेला आहे हेसुध्दा सांगितले. पण रफिक झकेरिया म्हणाले, तुमचे म्हणणे कितीही बरोबर असले तरी शासनाचे धोरण ठरायचे आहे. मी पाहतो नियमात राहून तुम्हाला काय मदत करता येईल. ७/८ वेळा माननीय शिक्षणमंत्री रफिक झकेरिया यांना भेटलो, पण पाहतो, बघतो यापलीकडे काहीच प्रगती झाली नाही. त्याचवेळी माझ्या घरात माझ्या लग्नाची तयारी सुरू झाली. घरात अण्णा व आईला वाटू लागले याचे आता लग्न केले तर थोडा आवाक्यात येईल, बंधनात अडकेल. मी रात्री दोनच्यापूर्वी कधीच घरात आलो नव्हतो, तसेच मी रेंगेपर्यंत अण्णा बाहेर खुर्ची टाकून व आई दरवाजाच्या उंबरठ्यावर माझी वाट पाहत बसलेली असायची. सकाळी आठ ते रात्री दोन फक्त काम व शाळा उभी करणे येईल याचा प्रयत्न. अनेकांच्या भेटी, अनेकांकडून माहिती जमा करणे, नियम कायदा समजावून घेणे, अनेक तज्ज्ञ मंडळींकडे जाऊन शाळा प्रशासनाची माहिती करून घेणे यातच दिवस जात होता. शिवाय खिशात पैसे नसल्याने दिवसभर उपाशी राहून पायी पायपीट चालायची. पायी फिरण्यास मला कधीच ऊन, पाऊस यांनी अडवले नाही. शाळेला मान्यता मिळण्यासाठी शाळेसंबंधी असलेल्या सर्व कार्यालयांत अनेक वेळा जात होतो. तिथून माहिती करून घेत होतो म्हणून लग्न लवकर करायचे नाही असे ठरवले होते. शिवाय अनेक शाळा प्रकरणातून अनेक वैरी निर्माण झाले होते. वरवर शांतता असेल तर वैरी केव्हा घात करतील हे सांगता येत नव्हते. एकदा रात्री अशाच सप्टेंबरच्या आसपास शाळा सुरू झाल्यानंतर शेवटच्या ट्रेनमधून प्रवास करून भांडुप स्टेशनला उतरलो. भांडुप स्टेशनपासून चालत चालत शिवाजी तलावाकडून घरी येत होतो. रस्त्यावर एकही वाहन नव्हते. रात्री दोनच्या आसपासची वेळ होती. मी दिवसभर खूप दमलो होतो म्हणून दमादमाने चालत होतो व ध्यानीमनी नसताना व मी रस्त्याच्या कडेने चालत असताना एक ट्रक भरधाव वेगाने समोरून येताना दिसला. ट्रकचा लाईट माझ्या डोळ्यावर पडल्याने मी सावध झालो. मी कडेने चालत असताना तो ट्रक सरळ मी जेथून चालत होतो त्या बाजूने माझ्या अंगावर आला. मी सावध असल्याने पटकन डोप घेऊन मी अधिक आत फूटपाथच्या दिशेने उडी मारली व तो ट्रक समोरच्या दुकानावर धाडकन आपटला. मी अंधारात एका बाजूने थरथरत उभा राहिलो. ट्रक धडकन आपटल्यानंतर आत ड्रायव्हरशिवाय कोणीही नव्हते. ड्रायव्हरने उडी मारली व पळून गेला. मी अंधारातच लपून होतो. ड्रायव्हरला पळताना मी पाहिले. चेहरा ओळखीचा वाटला, मग लक्षात आले की, ट्रक माझा जीव घेण्यासाठी होता. मी तसाच थरथरत घरी आलो. झालेली घटना कोणालाही सांगितली नाही. अण्णा आईला हे सांगितले असते तर माझे घरातून बाहेर पडणे कदाचित बंद झाले असते. दुसऱ्या जिवघेण्या प्रसंगातून मी वाचलो. त्यामुळे निसर्ग प्रसंग जेव्हा केव्हा घडेल तेव्हा मला माझ्या जिवाचे काही सांगता येणार नाही. त्यामुळे लग्न न केलेले बरे, असे मी ठाम ठरवले होते. शिवाय या शाळा प्रकरणात माझ्यावर झालेले हल्ले व इतर प्रसंगाबाबत व माझ्या कामाबाबत, माझ्या लढाईबाबत सारखे वर्तमानपत्रात काहीना काही येत होते. त्यामुळे नातेवाईकांत माझी प्रतिमा खतरनाक अशी झाली होती. माझी लढाई का चाललेली आहे, याचा विचार करण्यापेक्षा मी कोणाबरोबर लढतोय व या लढाईचा शेवट भयानक होणार हे सर्वांना जाणवत होते. सांगायचं म्हणजे मीदेखील जिवावर उदार होतो. कारण माझ्याकडे काहीच नव्हते व मेलो तरी एक शाळा उभी करून मरणार म्हणजे अखंडपणे माझे नाव समाजात राहील. म्हणून लग्न न करण्याचा निर्णय मी घेतला होता. तेव्हा माझे चुलते नाना जे माझ्यावर त्यांच्या मुलांपेक्षा अधिक प्रेम करायचे ते स्वत: इमोशनल होते व माझ्या लहानपणापासूनचा माझा संघर्ष ते जवळून पाहत होते. माझ्या संघर्षाचा त्यांना अभिमान वाटत होता. माझे बालपण अनेक संघर्षात गेले, पण प्रत्येक संघर्ष करून अनेक विषय मीच घेतले. त्यामुळे ते नाना, अण्णा, आई, मी दररोज सुमारे ७/८ महिने लग्न कर, लग्न कर असे सतत सांगू लागले. त्यांच्या आग्रहापुढे मी हतबल झालो. नेहमीच घरात आल्या आल्या तोच विषय. मग मी जाचक अट घातली की बी.एड. झालेली मुलगी असली पाहिजे. पण झालं उलटं. माझ्या लग्नाला होकार आला. माझे वडील अण्णा, सख्खे चुलते नाना, चुलत चुलते तुकाराम, संपतराव या सर्वांनी एकत्रपणे मुलगी शोधमोहीम सुरू केली. मी सर्वांना कामाला लावले व आता काय वर्षभर किमान आपल्याला शांतता आहे. परत मी माझ्या कामात लक्ष घातले. रात्री घरी आल्यावर अण्णा दररोज नवीन नवीन मुलींचे फोटो दाखवायचे व मी ठरल्याप्रमाणे नकार द्यायचो. पहिला प्रश्न बी.एड्. आहे की नाही? मग नाही. स्पष्ट नकार. लग्न विषयावर पुन्हा केव्हातरी सविस्तर नक्की लिहीन.

शाळा सुरू होऊन शाळेला महाराष्ट्र शासनाची मान्यता नव्हती. तेवढ्यात खासदारकीच्या निवडणुका लागल्या. निवडणुकीची धामधुम सुरू असताना आमच्या ईशान्य मुंबईतून 'प्रमोद महाजन' खासदारपदाची निवडणूक लढवणार आहे हे माहीत पडले. कोणीतरी या दरम्यान माझ्याकडे प्रमोद महाजनचे बंधू प्रवीण महाजन व मुलगा राहुल महाजन यांना घेऊन निवडणुकीच्या प्रचारकामासाठी सहकार्य करावे. भांडुपमध्ये कुठेकुठे काय केले पाहिजे, कोणाला भेटले पाहिजे, सभा कुठे लावल्या पाहिजे व प्रचारात वेग कसा घेता येईल याबाबत चर्चा करण्यासाठी आले. सुमारे २/३ तास शाळेच्या मोकळ्या जागेवर आमची चर्चा झाली व शेवटी प्रविण महाजन व राहुल महाजन मला म्हणाले, सर तुमचे नाव आम्ही खूप ऐकले आहे. तुम्ही आम्हाला मदत करा निवडून आल्यावर आम्ही तुम्हाला मदत करू त्या संधीचा मी फायदा घेण्याचे ठरविले व त्या दोघांना स्पष्टपणे सांगितले. महाजन साहेब निवडून येतीलच, पण तरीही काही झाले तर माझे एकच काम करा. मला माझ्या शाळेला मान्यता घेऊन द्या. त्यांना राहुल महाजनांनी शब्द दिला व आम्ही निवडणुकीच्या कामाला लागलो. या दरम्यान राहुल महाजनांनी एकदा मला वरळी येथे निवासस्थानी बोलावून प्रमोद महाजनांबरोबर

Scanned with CamScanner

भेट घडवून माझ्या शाळेला महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळवून द्यायची आहे व तसा शब्द दिला आहे हे सांगितले. महाजन साहेब फक्त हसले व माझ्याकडे पाहून म्हणाले, राहुलने तुला शब्द दिला आहे. निवडून येण्याचे सोडा निवडणूक झाल्याबरोबर तुझं पहिलं काम करणार. हे महाजन साहेबांचे शब्द आजही मला आठवतात. त्याच वेळी माझ्यात शंभर हत्तींचे बळ आपोआप आले. त्यानंतर महाजन साहेब निवडून आले. साहेबांच्या खासदारफंडातून त्यांनी माझ्या शाळेच्या भोवती संरक्षण भिंत बांधण्यासाठी साडेपाच लाखांचा निधी दिला व पहिलेच माझ्या शाळेच्या ठिकाणी काम सुरू झाले. त्यानंतर महाराष्ट्रात निवडणुका लागल्या. येथे शिवसेनेचे व भाजपाचे सरकार आले. या अगोदर माझ्या घरातील मंडळींनी लग्नाची मोहिम फत्ते केली होती व माझे ११ मे १९९७ रोजी लग्न झाले. १९ मे २००७ रोजी प्रमोद महाजनांनी शाळेसाठी साडेपाच लाख शाळेला दिले. शाळेच्या संरक्षण भिंतीचे काम सुरू झाले. एका बाजूला शाळेचे बांधकाम, दुसऱ्या बाजूला घरात माझ्या लग्नाची तयारी, माझा साखरपुडा फेब्रुवारीत झाला, पण लग्न मेमध्ये झाले. पण फेब्रुवारी ते लग्न होईपर्यंत होणाऱ्या पत्नीला एकदाही भेटलो नाही. एवढेच नव्हे तर माझ्या हळदीच्या दिवशीसुद्धा मी संध्याकाळी सात वाजेपर्यंत घरी नव्हतो. शाळेच्या कामासाठी सकाळीच बाहेर पडलो. घर पाहुण्यांनी भरलेले व हळदीच्या दिवशी संध्याकाळी आठपर्यंत मी घरीच नाही, काही संपर्क नाही, सर्वजण तणावाखाली. शेवटी आठच्या आसपास मी धावत धावत घरी आलो. तेव्हा सर्वांचा जीव भांड्यात पडला. दुसऱ्या दिवशी लग्न. लग्नाला भांडुपमधील सर्वच राजकीय मंडळी होती. त्यानंतर लग्नाच्या दुसऱ्या दिवशी पुन्हा शाळेत किती काम झाले, हे पाहायला गेलो. लग्नाच्या तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशी तेव्हा शिवसेना-भाजपाचे सरकार असल्याने शिक्षणमंत्री सुधीर जोशी व मुख्यमंत्री मनोहर जोशी होते. त्याचवेळी समजले की, मे अखेरीपर्यंत शाळेची यादी सरकार जाहीर करणार आहे म्हणून लग्न झाल्यानंतर ३ ते ४ दिवसांनी परत मी वरळीला महाजन साहेबांना भेटायला गेलो. त्यांनाही आश्चर्य वाटले, ते म्हणाले अरे तुझं लग्न झालंय ना! राहुल लग्नाला आला होता. तोही घरात होता. तोही म्हणाला, ३/४ दिवस तर झाले लग्न होऊन लगेचच बाहेर कसे पडलात. तेव्हा त्यांनाही सांगितले की, मे अखेरीपर्यंत शाळांची यादी जाहीर होणार आहे. व माझ्या शाळेचे नाव त्या यादीत असायला हवे आहे. त्यांनी लगेच शिक्षणमंत्री सुधीर जोशी यांना फोन लावला व त्यांना माझ्याबद्दल सांगितले व असेही म्हणाले की, मी पत्र घेऊन त्यांना तुमच्याकडे पाठवतोय. त्यांचे काम झाले पाहिजे. मी प्रमोद महाजनांचे पत्र घेऊन सुधीर जोशींकडे गेलो ते मला चांगले ओळखत होते. तेसुध्दा म्हणाले अरे माझ्याकडे डायरेक्ट यायचे. असो. मी तुझ्या शाळेचे नाव यादीत घेतो, पण तरीही मला शेवटपर्यंत भीती होती आयत्यावेळी काहीही घडते म्हणून सावध

पवित्रा म्हणून मी मा.शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना भेटण्याकरिता मातोश्रीवर गेलो. सुरुवातीला ३/४ वेळा गेलो पण भेट झाली नाही. कारण साहेबांकडे नेहमी खूप गर्दी असायची व प्रत्येकाला अगोदर वेळ दिलेला असायचा. मी सकाळपासून रात्री १२-१२ वाजेपर्यंत मातोश्रीच्या मेन गेटवर उभा राहायचो. तेव्हा तेथे असलेल्या अनेक पोलिस अधिकाऱ्यांना माझी दया आली. त्यावेळी मातोश्रीमधून एक व्यक्ती पुढे आली. त्यांनी मला आत नेले. ते 'राजे' होते त्यांनी विचारपूस केली व ३/४ दिवसांनी ये तुझी व साहेबांची भेट घालून देतो. त्याप्रमाणे मी गेलो व साहेबांना लेखी निवेदन दिले व सांगितले की साहेब कृपा करा. साहेब म्हणाले 'जा' तुझे काम होईल व त्यांनी राजना पुढील निर्देश दिले. मी नेहमीप्रमाणे रात्री सुधीर जोशींच्या शासकीय निवासस्थानी सकाळी ८.३० वाजता पोहचलो. तेव्हा खरंच सुधीर जोशी म्हणाले, अरे तुझ्या शाळेचे नाव मातोश्रीवरूनच आलेय. आम्ही कोण अडवणार? होऊन जाईल तुझं काम. अशारीतीने माझ्या शाळेला महाराष्ट्र शासनाची मान्यता व परवानगी मिळाली. अशा तऱ्हेने शासन दरबारी माझ्या शाळेची नोंद झाली. एक अपत्य पूर्णपणे जन्माला आले. त्याचे नाव राजारामशेठ विद्यालय.

पुढे शाळेला विरोध करणाऱ्या व माझ्यावर हल्ला करणाऱ्यापैकी एकाचा अकस्मात मृत्यू झाला. एकाचे दोन्ही पाय ट्रेन खाली गेले. एकजण कायमचा 'वेडा' झाला. मुंबईतील एका कुविख्यात गुंडाला कायमची मुंबई सोडावी लागली. राजकीय नेत्यापैकी एकजण हृदयविकाराने शाळेचे उद्घाटन झाल्यानंतर ३/४ महिन्यांनी मेला, तर एक मंत्री कायमचा राजकारणातून निवृत्त होऊन घरी बसला. आमदार, नगरसेवक या लोकांना कायमचे राजकारणातून निवृत्त करून घरी बसवले.

पण मला माझ्या शाळेला ज्यांनी ज्यांनी मदत केली ते ते पोलिस व म.न.पा.चे अधिकारी, मित्र, हितचिंतक केव्हातरी वर्षा दोनवर्षांनी अचानकपणे भेटतात व आवर्जून शाळा कशी काय आहे, हे विचारतात. शाळेची प्रगती विचारतात व जुन्या घटनांवर चर्चा होऊन ते अधिकारी आवर्जून बोलतात. आम्ही आमच्या सेवेत एकच पुण्यांचे काम केले ते म्हणजे तुमच्या शाळेला मदत. ते जुने अधिकारी केव्हातरी शाळेत कार्यक्रमाला येतात व चेहऱ्यावर एक समाधान घेऊन जातात. कारण दोन खोल्यांत सुरू झालेल्या शाळेचे भव्य रूप धारण केलेले आहे.

माझी शाळा माझं पहिलं अपत्य. ज्याला मी जन्म दिला ते आज तारुण्याने बहरून आले आहे.

संस्थापक
श्री. रमेश खानविलकर
९८९२२४१८५५

Scanned with CamScanner